दिनांक ०५/०९/२०२६

**-: प्रेसनोट :-**

| | |
|---|---|
| घटक | मुंबई विभाग |
| तक्रारदार | पुरुष, वय ३६ वर्षे |
| आरोपी | १) रमेश गोपाळ साळवे, वरिष्ठ निरीक्षक, अनुज्ञापन खाते.<br>२) विजय सिताराम ठाकरे, कार्यकारी सहाय्यक.<br>दोन्ही एम/पश्चिम वॉर्ड, चेंबूर, बृ.म.न.पा., मुंबई. |
| तक्रार | यातील तक्रारदार यांचेकडे एम/पश्चिम वॉर्ड, चेंबूर, बृ.म.न.पा., मुंबई येथील झालेल्या हातगाडी व भंगाराच्या लिलावामधील माल गोडाऊन मधून बाहेर काढून देण्याकरीता लोकसेवक विजय ठाकरे व लोकसेवक रमेश साळवे यांनी शासकीय फी व्यतिरिक्त रु. १,७०,०००/- लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लोकसेवक यांच्याविरूध्द ला.प्र.वि, मुंबई विभाग येथे दिनांक ०२/०९/२०२६ रोजी तक्रार केली. |
| तक्रारीची पडताळणी | प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०३/०९/२०२६ रोजी पडताळणी केली असता, लोकसेवक विजय ठाकरे यांनी स्वत:करीता व लोकसेवक रमेश साळवे यांच्याकरीता तक्रारदार यांच्याकडे रु. १,७०,०००/- लाचेची मागणी करुन लाचेचा पहिला हफ्ता म्हणून रू. ८०,०००/- स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. |
| सापळा कार्यवाही | दिनांक ०४/०९/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक विजय ठाकरे यांना तक्रारादार यांच्याकडून लाचेचा पहिला हफ्ता रू. ८०,०००/- स्विकारताना एम/पश्चिम वॉर्डचे भंगाराचे गोडावुन, माहुलगाव येथे रंगेहाथ पकडण्यात आले आहे. लोकसेवक ठाकरे यांनी लाचेची रक्कम स्विकारलेबाबत लोकसेवक साळवे यांना मोबाईल फोनव्दारे माहिती दिली असता, त्यांनी त्यास होकार देवुन अनुमोदन दिले. लोकसेवक साळवे यांना त्यांच्या कार्यालयातुन ताब्यात घेण्यात आले आहे. |
| गुन्हा रजिस्टर नं./ कलम/ पोलीस ठाणे/ जिल्हा, दिनांक व वेळ | २५/२०२६, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७, १२.<br>ला.प्र.वि., मुंबई विभाग<br>दिनांक ०५/०९/२०२६ रोजी ०८:१० वा. |
| आरोपी अटक दिनांक व वेळ | दिनांक ०५/०९/२०२६ रोजी ०८:१० वा. |
| सापळा अधिकारी | श्री सागर आरगडे, पोलीस निरीक्षक, मो.नं. ७०३८२५०७०७. |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. शुभदा मोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मो.नं. ८६९१८८११३३. |
| सापळा पथक | १) पो.ह. ९७०६५४/पाडळे २) पो.ह. ०१०३९९/साटम ३) पो.ह. ०३१२००/रावराणे<br>४) म.पो.शि. ०९१२६७/बाबर ५) पो.शि. ०९२२६२/दराणे ६) म.पो.शि. १५०९८२/साळवी<br>७) पो.शि.चा. १४२५०/ गारळे ८) पो.शि.चा. २१६३९५/साबळे. |
| मार्गदर्शन | १) श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि., मुंबई<br>२) श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त(१), ला.प्र.वि., मुंबई, मो.नं. ७७९६५९११००<br>३) श्री. अनंत साळुंखे, अपर पोलीस उप आयुक्त(२), ला.प्र.वि., मुंबई, मो.नं. ८२७५१८८११९ |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमूद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुख्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई. | सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०००३० |
| दूरध्वनी क्र. :- 022-24921212, 022-24922618<br>व्हॉट्सअप क्र. :- 8828241064<br>हेल्पलाईन क्र. :- 1064, | दूरध्वनी क्र. :- 022-24921212, |
| ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in | ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in |

( अजित सुर्के )
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई